कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर

।। विद्वान् सर्वत्र पूज्यते ।।

शिक्षणमहर्षी कै.डॉ.ग.श्री. खैर
तथा अण्णासाहेब खैर

पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

समाचार

Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine **July 2017** - Pages - 44

संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे कार्यकारी संपादक : प्राचार्य हणमंत भोसले

✻ पुणे ✻ वर्ष ६८ वे ✻ अंक ९ ✻ **जुलै २०१७** ✻ किंमत रु. १०/- ✻ वार्षिक वर्गणी रु. १००/-

डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कुल, नाशिक येथे
दि. २१ जून २०१७ जागतिक योगदिनानिमित्त महापौर सौ. रंजना भानसी यांचा सत्कार करताना
संचालक श्री. संजय गुंजाळ, उजवीकडून नगरसेवक श्री. अरुण पवार,
संचालक श्री. अमोल जोशी व डॉ. निहार वाळिंबे, योग शिक्षक श्री. रमेश धस,
नगरसेविका सौ. शालिनी पवार, मुख्याध्यापिका सौ. मनिषा साठे व सौ. सोनिया राजवाडे

✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरुळ शाखा, नवी मुंबई ✻

इ. १२ वी मध्ये वाणिज्य विभागामधून प्रथम आलेली विद्यार्थिनी कु. नेहा जाधव हिस शुभेच्छा देताना मा. श्री. सुभाष देशपांडे, व्हा. चेअरमन, कर्नाळा नागरी सहकारी बँक लि., पनवेल, समवेत संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर व श्री. दिनेश मिसाळ

श्री. अविनाश कुलकर्णी यांना अध्यापक निबंध स्पर्धेमध्ये प्रथम पुरस्कार प्रदान करताना प्रमुख अतिथी मा. श्री. बाळाराम पाटील, (शिक्षक आमदार, कोकण विभाग), समवेत संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर व श्री. दिनेश मिसाळ

नेरुळ शाखेच्या वर्धापन दिनानिमित्त उपस्थित ज्येष्ठ माजी विद्यार्थी मा. श्री. चि. त्र्यं. मराठे शाळेच्या तिसऱ्या मजल्याच्या बांधकामासाठी रुपये एक लक्ष च्या देणगीचा धनादेश संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर यांच्याकडे सुपूर्त करताना, समवेत संचालक श्री. दिनेश मिसाळ

संपादकीय

अशी ही नवी दृष्टी !

विश्वाचा आणि कालाचा विस्तार अनंत अनादी आहे. सामान्य माणसाला त्याची कल्पना येत नाही. गीतेच्या ११ व्या अध्यायात भगवान अर्जुनाला म्हणाले - या सृष्टीची व कालाची कल्पना तुला तुझ्या दृष्टीने यायची नाही. मी तुला दिव्य दृष्टी देतो ! आणि मग या विशाल विश्वाचे आणि काळाचे मूर्तिमंत चित्र त्यांनी अर्जुनापुढे उभे केले.

दिव्य दृष्टी म्हणजे जगाकडे पाहण्याची व्यापक विशाल दृष्टी. आपले आकुंचित स्थान आणि आपला चालू मर्यादित काळ यांच्या कक्षा विस्तृत करीत, करीत, त्या अनंतापर्यंत नेऊन पोचवायच्या. आजचे शास्त्रज्ञ व इतिहास संशोधक तेच करीत आहेत.

या दिव्य दृष्टीचा उपयोग रोजच्या आपल्या कौटुंबिक, सामुदायिक, सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनात देखील करता येईल. ज्यांनी तो केला ते उदार दूरदृष्टी पुरुष म्हणून प्रसिद्ध झाले. इतका लांबचा पल्ला गाठता आला नाही तरी आपल्या भोवतालच्या समाजाकडे व्यापक दृष्टीने पाहायचा प्रयत्न करा. त्यातील विविधताही पाहा आणि एकताही पाहा. आपण त्या समाजात आणि तो आपल्या जीवनाचा भाग या आपलेपणाने पाहा.

तसेच तुमच्या स्मृतीत असलेल्या कालाचा विचार करा. त्याच्याही मागली माहिती इतिहास देईल ती मिळवा. आणि तशीच कल्पनेची दृष्टी भावी काळावर वळवा. म्हणजे जीवनातील संक्रमणाचे चित्र तुमच्या दृष्टीपुढे उभे राहील. मागचा, आजचा आणि उद्याचा काळ अखंड आहे. त्यात सतत जन्म-जीवन-मृत्यू यांचे चक्र फिरत आहे. ते चक्र व्यक्ती, कल्पना, विचार, समाज, राजकारण या सर्वांचेच मागे लागले आहे असे दिसेल. माणसे आणि श्रद्धा यात सतत संक्रमण होत आहे ते कळेल.

हीच दिव्य दृष्टी, हीच विशाल, व्यापक दृष्टी. काळाच्या उदरात डोकावणारी दृष्टी. पृथ्वी आणि सूर्य-मंडळ भेदून अनंत अनंत विश्वे पाहणारी दृष्टी. हिचा तत्त्वज्ञानात उपयोग आहे, विज्ञानातही आहे आणि रोजच्या जीवनात तर आहेच आहे.

पुनर्मुद्रित संपादकीय **कै. ग. श्री. खैर**
अ. श्रावण शु. १
१९.७.१९६६

महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

कार्यवाह : प्रा. राजेंद्र सं. कांबळे
प्राचार्य : डॉ. टी. आर. गोराणे

इ. १२ वी बोर्ड निकाल २०१७
एच. एस. सी. (विज्ञान-बायफोकल)

शाखा	प्रविष्ठ विद्यार्थी	उत्तीर्ण	शेकडा निकाल
मेकॅनिकल मेंन्टेनन्स	३६	३६	१००
इलेक्ट्रीकल मेंन्टेनन्स	२६	२६	१००
कॉम्प्युटर सायन्स	३९	३९	१००
इलेक्ट्रॉनिक्स	१७	१६	९४
इन्फॉर्मेशन टेक्नॉ.(IT)	२६	२५	९६

कनिष्ठ महाविद्यालयाचा शेकडा निकाल ९८.६१% इतका लागला.

गुणानुक्रमे प्रथम पाच विद्यार्थी खालील प्रमाणे

विद्यार्थ्याचे नाव	शाखा	६५० पैकी	शेकडा
कु. चैतन्य बळीनवर	इले.मेंन्टे.	६०६	९३.२५
कु. प्राची सातपुते	कॉम्प्यु. सायन्स	५८३	८९.६९
कु. अजिंक्य गायकवाड	इले.मेंन्टे.	५७२	८८.००
कु. गितांजली छप्परवाला	इले.मेंन्टे.	५६२	८६.४६
कु. ऋतुजा पवार	इले.मेंन्टे.	५५३	८५.०७

सर्व यशस्वी विद्यार्थी, त्यांचे सर्व शिक्षक, त्यांना सहाय्य करणारे शिक्षकेतर बांधव व सर्व विद्यार्थ्यांचे पालक यांचे संस्था पदाधिकारी व प्राचार्य यांचेतर्फे हार्दिक अभिनंदन !

एस. एस. सी. परीक्षा मार्च २०१७ निकाल
एकूण प्रविष्ठ विद्यार्थी - १०६
एकूण उत्तीर्ण विद्यार्थी - ८१
शेकडा निकाल ७६.४१%

गुणानुक्रमे प्रथम पाच विद्यार्थी खालील प्रमाणे

विद्यार्थ्याचे नाव	एकूण गुण	शेकडा गुण
चि. भापसेकर निखिल दिपक	४४२	८८.४०
चि. गाडे हर्षद सुधाकर	४३४	८६.८०
चि. काळे शुभम भाऊसाहेब	४२७	८५.४०
चि. भोसले आदित्य मुकुंद	४१७	८३.४०
चि. शिंदे ऋषिकेश रामराजे	३९९	७९.८०

प्रवेशोत्सव दिन उत्साहात साजरा

दि. १५ जून - शाळेचा पहिला दिवस. नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांच्या नवीन शाळेबाबत कुतुहलाचा दिवस. उत्तीर्ण होऊन पुढील वर्गात बसण्यासाठी उत्सुक विद्यार्थ्यांच्या आनंदाचा दिवस. सगळ्यांना पुन्हा एकत्रित आणून विद्यालयाने प्रवेशोत्सव दिन साजरा केला. संस्थेचे ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले यांच्या हस्ते इ. ५ वी ते इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात - सर्वशिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तकांचे तसेच गुलाब पुष्प, पेन्सिल यांचे वाटप करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे, पालक - शिक्षक संघ उपाध्यक्ष सौ. रेणुका सपकाळ आणि मोठ्या संख्येने पालक व शिक्षक उपस्थित होते. प्रमुख पाहुणे प्राचार्य हणमंत भोसले यांनी संस्थेच्या शैक्षणिक - सामाजिक प्रगतीचा इतिहास उपस्थितांना सांगितला. विद्यार्थी हिताचे अनेक अनुभव त्यांनी कथन केले. प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे यांनी विद्यार्थ्यांना 'शिस्त-स्वच्छता-गुणवत्ता विकास' या विद्यालयाने अंगिकारलेल्या त्रिसूत्रींचे स्पष्टीकरण दिले. ग्रंथपाल श्री. चंद्रकांत बागूल यांनी आभार प्रदर्शन केले. लेखनिक श्री. बाळकृष्ण शिंदे यांनी प्रवेशोत्सव दिनानिमित्त सर्वांना गुलाबपुष्प दिले. यावेळी शिक्षक-शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय योग दिन संपन्न

दि. २१ जून २०१७ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महाराष्ट्र विद्यालयाच्या प्रांगणात सकाळी ६.४५ ते ७.४५ या वेळामध्ये विविध योगासनांची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी सक्रियतेने सहभाग नोंदविला. त्यानंतर सकाळी ८.०० वाजता भारत स्काऊट आणि गाईड्स आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमामध्ये विद्यार्थी सहभागी झाले होते.

तेथे विद्यार्थ्यांना मा. शिक्षण संचालक श्री. गंगाधर म्हमाणे यांनी योगाचे महत्त्व सांगितले. पतंजलि समितीचे प्रमुख विजय सितापुरे यांनी विद्यार्थ्यांकडून विविध योगासने करुन घेतली. त्यामध्ये आपल्या प्रशालेचे ६० विद्यार्थी सहभागी झाले होते. सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीप्रत्रके देऊन गौरविण्यात आले.

तसेच दुपारी३.३० ते ५.२० पर्यंत श्री. आशिष देशपांडे यांची योगसाधनेवर आधारित सीडी २५० विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. आंतरराष्ट्रीय योगदिन सुरू करण्यामध्ये आपल्या भारताचा किती मोठा वाटा आहे, योगाचे प्रकार, फायदे याची माहिती देण्यात आली. यामध्ये विद्यालयामधील सर्व शिक्षक - शिक्षकेतर सेवकांनी सहभाग नोंदविला. सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक डॉ. टी. आर. गोराणे, शिक्षक श्री. बोंबलट यांचे मार्गदर्शन लाभले. ***

माध्यमिक शालांत परीक्षा मार्च २०१७ निकाल

कु. भापसेकर निखिल
८८.४०%

कु. गाडे हर्षद
८६.८०%

कु. काळे शुभम
८५.४०%

उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मार्च २०१७ निकाल

कु. चैतन्य बळीनवर
९३.२५%

कु. प्राची सातपुते
८९.६९%

कु. अजिंक्य गायकवाड
८८.००%

महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे

कार्यवाह : प्रा. राजेंद्र सं. कांबळे

प्र. प्राचार्य : प्रा. पी. व्ही. शिंदे

उन्हाळी परीक्षा २०१७ निकाल

उन्हाळी परीक्षा २०१७ चा निकाल अतिशय उत्तम लागला. विशेष गुणवत्ता प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे -

डिप्लोमा इन प्रिंटिंग टेक्नॉलॉजी (फुल टाईम)

प्रथम वर्ष

विद्यार्थ्याचे नाव	टक्के	क्रमांक
कु. काळे आशुतोष संजय	८१.४	प्रथम
कु. लामखेडे किरण राजेंद्र	६८.७७	द्वितीय
कु. भंडारी क्षितीजा मनोज	६६.९२	तृतीय
कु. कर्नाड गणेश	६६.७७	तृतीय

द्वितीय वर्ष

कु. ढोरे चैताली नामदेव	८२.६७	प्रथम
कु. तळेकर मनीष अशोक	७५.८७	द्वितीय
कु. सत्यम कुमार राय	७५.०२	तृतीय

तृतीय वर्ष

कु. कानडजे सोमीनाथ	८२.५७	प्रथम
कु. साळुंखे वृषाली राजेंद्र	८०.२९	द्वितीय
कु. पांढरे प्राची धनंजय	७६.७१	तृतीय

डिप्लोमा इन प्रिंटिंग टेक्नॉलॉजी (पार्ट टाईम)

प्रथम वर्ष

कु. मराठे जयेश जितेंद्र	७०.३२	प्रथम

तृतीय वर्ष

कु. वाडकर चैतन्य संजय	६१.०२	प्रथम

{SßbmŒm BZ qàqQ>J Q>³ZmbmOr (’$b QmB‘)

H$. H$mi AmeVmf gO¶
àW‘ df - àW‘

H$. Tma MVmbr Zm‘Xd
{ÛVr¶ df - àW‘

H$. H$mZS>O gm‘rZmW
VVr¶ df - àW‘

{SßbmŒm BZ Bb³Qm{Z³g AÊS> Q>{bH$å¶{ZH$eZ

H$. KmS>ZXrH$a gH$V AaqdX
àW‘ df - àW‘

H$. ~mèhmS> AObr {ZVrZ
{ÛVr¶ df - àW‘

H$. gmH$m ídVm ì¶H$Q>e
VVr¶ df - àW‘

चतुर्थ वर्ष

चि. कारादन्नेवार करण	७३.०५	प्रथम
चि. धुमाळ श्रीनिवास	६५.०९	द्वितीय
चि. खलाटे ओंकार	६५.०५	द्वितीय

डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्यु.

प्रथम वर्ष

चि. घोडनदीकर संकेत अरविंद	७८.४३	प्रथम
चि. शहापूरकर पुरुषोत्तम विजय	७६.००	द्वितीय
चि. धुमाळ अर्णव धनंजय	७१.००	तृतीय

द्वितीय वर्ष

कु. बोराडे अंजली नितिन	८१.१३	प्रथम
कु. पाटील साक्षी संजय	७४.३८	द्वितीय
कु. दिघे शितल लक्ष्मण	६९.००	तृतीय

तृतीय वर्ष

कु. साका श्वेता व्यंकटेश	८४.३८	प्रथम
चि. देशपांडे अथर्व योगेंद्र	८०.००	द्वितीय
चि. साळुंखे आशिष राजेंद्र	७७.१३	तृतीय

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !

अधिव्याख्याता प्रशिक्षण

NITTTR भोपाळ व एम. एस. बी. टी. ई. मुंबई यांनी महाराष्ट्रातील तंत्रनिकेतन मधील अधिव्याख्यात्यां करिता १२ दिवसांचे 'इंडक्शन फेज टू' हे प्रशिक्षण दि. २२ मे २०१७ ते २ जून २०१७ या कालावधीमध्ये CWIT पुणे येथे आयोजित केले होते. सदर प्रशिक्षण प्र. प्राचार्य पी. व्ही. शिंदे व अधिव्याख्याता श्री. ए. ए. रावेतकर यांनी यशस्वीरित्या पूर्ण केले.

करिअर फेअर

दि. ९ जून २०१७ रोजी एम. एस. बी. टी. ई., मुंबई व के. ई. सोसायटी राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांनी दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणामध्ये उपलब्ध शिक्षणाच्या संधीबद्दल करिअर फेअर आयोजित करण्यात आले होते. सदर करिअर फेअरमध्ये संस्थेच्यावतीने कु. व्ही. व्ही. शिर्के, श्री. टी. एम. कोंडे, श्री. अ. व. गजभिये, श्री. शेखर वरखडे यांनी संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या विविध अभ्यासक्रमांची व प्लेसमेंटबद्दल सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. संस्थेच्या स्टॉलला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ***

अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, पुणे

संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर

प्राचार्य : डॉ. योगेश नेरकर

व्हर्च्युअल लॅब ट्रेनिंग वर्कशॉप

दि. १६ जून ते १८ जून २०१७ या कालावधीमध्ये व्हर्च्युअल लॅब ट्रेनिंग वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून कुलसचिव श्री. सुनील रेडेकर हे उपस्थित होते. संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. इंडियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, पवई, मुंबई, चे श्री. पुष्पदीप मिश्रा, प्रोजेक्ट मॅनेजर व्हर्च्युअल लॅब व श्री. जय माथूर रिसर्च स्कॉलर, तसेच प्रा. मनिश नागोशे व प्रा. तनुजा खटावकर यांनी ६५ प्राध्यापक व विद्यार्थी यांना व्हर्च्युअल लॅब डेव्हलपमेंटसंबंधी ट्रेनिंग दिले. इंडियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, पवई, मुंबई च्या प्रा. सौ. आरती दिवाकर, यांनी त्यांच्या भाषणात तंत्रज्ञान महाविद्यालयाकडून व्हर्च्युअल लॅब डेव्हलपमेंट या भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या प्रोजेक्टमधील महत्त्वाच्या सहभागाबद्दल कौतुक केले. **महाविद्यालयास (व्हर्च्युअल लॅब पुणे विभागीय कार्यालय) चा दर्जा बहाल केला** व पुणे विद्यार्थी गृह प्रशासनाचे आभार मानले. संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर यांनी अध्यक्षीय भाषण केले. तीन दिवसांची विशेष कार्यशाळा यशस्वीरित्या संपन्न झाली. ***

मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

कार्यवाह : प्रा. राजेंद्र कांबळे
प्र. प्राचार्या : सौ. नूतन बापट
प्र. मुख्याध्यापिका : सौ. उत्कर्षा केणी

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ हे दि. १५ जून २०१७ रोजी शाळेच्या सर्व विभागांच्या नियमित वेळेनुसार सुरू झाले.

उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इ. १२वी) २०१६-१७ निकाल

फेब्रुवारी मार्च २०१६-१७ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल ऑनलाईन पद्धतीने दि. ३० मे २०१७ रोजी जाहीर झाला. विद्यार्थ्यांना गुणपत्रिकेचे वाटप दि. ९ जून २०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता करण्यात आले. उच्च माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले.

मुक्तांगण कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९८.०९% इतका लागला असून ४० विद्यार्थ्यांनी विशेष योग्यता श्रेणी प्राप्त केली तर १०० विद्यार्थी प्रथम श्रेणीत, १११ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले व ६ विद्यार्थी पास श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले.

प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे :

विद्यार्थ्याचे नाव	गुण	क्रमांक
कु. प्रथमेश गायकवाड	८८.९२%	प्रथम
कु. श्रेया ठिगळे	८६.९२%	द्वितीय
कु. अथर्व बुगडे	८५.६९%	तृतीय

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ. १०वी) २०१६-१७ निकाल

मार्च २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहीर झाला. या परीक्षेत मुक्तांगण इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश मिळविले. **या परीक्षेसाठी शाळेतून एकूण ३३९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. ४४ विद्यार्थ्यांनी ९०% आणि त्याहून अधिक गुण मिळविले. १९३ विद्यार्थी विशेष योग्यता श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले. १११ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले. ३५ विद्यार्थी द्वितीय श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले. उल्लेखनीय बाब अशी की सन १९८५ पासून म्हणजे गेली ३३ वर्षे शाळेचा इ. १०वीचा निकाल १००% लागत आहे.**

प्रथम पाच क्रमांकात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे :

विद्यार्थ्याचे नाव	गुण	क्रमांक
कु. ईशा नवाथे	९९.८०%	प्रथम
कु. रचना पाटील	९८.६०%	द्वितीय
कु. आसावरी बापट	९८.४०%	तृतीय
कु. दुर्वा महाजन	९६.८०%	चतुर्थ
कु. खुशी बंग	९६.२०%	पाचवा
कु. मिताली खेडकर	९६.२०%	पाचवा

संपूर्ण संस्कृत या विषयामध्ये कु. कुशल गांधी व कु. साहिल मोकाशी यांना १०० पैकी १०० गुण मिळाले. कु. संकेत महालपुरे व कु. मिहिर गुजराथी या विद्यार्थ्यांनी गणित या विषयामध्ये १०० पैकी १०० गुण मिळविले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन !

अभिनंदनीय

'युनियन इंटरनॅशनल पेंटेथलॉन असोसिएशन'ने दि. १७ जून २०१७ रोजी आयोजित केलेल्या 'लासरन' स्पर्धेत माध्यमिक विभागातील कु. अर्जुन देशमुख (इ. ५वी अ) या विद्यार्थ्याने भाग घेऊन ४था क्रमांक मिळविला. दि. १८ जून २०१७ रोजी आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय बिथलॉन स्पर्धेत भाग घेऊन त्याने

मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

इ. १२ वी निकाल सन २०१६ - १७

H$. àW'e Jm¶H$dmS>
88.92%

H$. I¶m {R>JU
86.92%

H$. AWd ~JS>
85.69%

B. 10 dr {ZH$mb gZ 2016 - 17

H$. Bem ZdmW
99.80%

H$. aMZm nmQrb
98.60 %

H$. Amgmdar ~mnQ>
98.40 %

H$. Xdm 'hmOZ
96.80 %

H$. I er ~J
96.20 %

H$. {'Vmbr I S>H$a
96.20 %

६वा क्रमांक मिळविला. त्याला प्रमाणपत्र, पदक व रोख रक्कमेचे बक्षीस मिळाले.

दुबई येथे दि. १९ मे २०१७ रोजी आयोजित केलेल्या बुडोकॉन इंटरनॅशनल कराटे स्पर्धेत माध्यमिक विभागातील **कु. तन्वी बुऱ्हाडे (इ. ६वी अ) या विद्यार्थिनीने सुवर्णपदक व कांस्यचषक पटकावले.**

✻ पाचगणी येथे दि. ३० एप्रिल ते ३० मे २०१७ या दरम्यान आयोजित केलेल्या आर्मी कॅम्प मध्ये माध्यमिक विभागातील कु. श्रीनिवास भिसे (इ. ७वी अ) या विद्यार्थ्याने भाग घेऊन 'बेस्ट कमांडो' हे बक्षीस पटकावले.

हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा

हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये घेण्यात आली. या परीक्षेस शाळेच्या माध्यमिक विभागातून एकूण ३७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.

परीक्षेचा निकाल १००% लागला. ११ विद्यार्थी विशेष श्रेणीत, २० विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर २ विद्यार्थी पास या श्रेणीत उत्तीर्ण झाले. निकाल पुढीलप्रमाणे :

बालबोधिनी परीक्षा (इ. ५वी साठी)

विद्यार्थ्याचे नाव	गुण	क्रमांक
कु. शर्वरी थत्ते	९४%	प्रथम
कु. ऋतुराज भोमे	९२%	द्वितीय

प्राथमिक परीक्षा (इ. ६वी साठी)

कु. अभिषेक करंबेळबर	८७%	प्रथम
कु. आर्या कदानी	८६%	द्वितीय

प्रवेशिका परीक्षा (इ. ७वी साठी) गुण २०० पैकी

कु. साक्षी शिरकांडे	१४३	प्रथम
कु. पश्चिमा वैद्य	१४३	प्रथम
कु. ईश्वरी उबाळे	१४३	प्रथम
कु. समृद्धी रसाळ	१४२	द्वितीय
कु. शर्वरी सुर्यवंशी	१४२	द्वितीय
कु. शुभांगी थोपटे	१४२	द्वितीय

सुबोध परीक्षा (इ. ८वी साठी) २०० पैकी

कु. अनुष्का डुंगरवाल	१२६	प्रथम
कु. मृणाल पाठक	१२०	द्वितीय

आंतरराष्ट्रीय योग दिवस

मागील वर्षाप्रमाणेच दि. २१ जून २०१७ रोजी पूर्व-प्राथमिक व प्राथमिक विभागात आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. यावेळी 'सहजयोग - आजचा महायोग' या उपक्रमात ज्युनियर के.जी. पासून इ. ४थी पर्यंतचे विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी योग केंद्रातून सौ. सीमा देशमुख व त्यांचे सहकारी उपस्थित होते. त्यांनी योगाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देऊन त्यांच्याकडून योगासने, प्राणायाम व सूर्यनमस्कार करून घेतले. यावेळी शारीरिक शिक्षणाच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून योगासने करून घेतली.

या कार्यक्रमाची सुरूवात सौ. ज्योत्स्ना सुदुंबरेकर यांनी केली. यावेळी पूर्व-प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ. उत्कर्षा केणी, पर्यवेक्षिका सौ. अनुपमा गुजराथी, प्राथमिक विभागाच्या शिक्षिका प्रतिनिधी सौ. मधुरा महाडीक याही उपस्थित होत्या.

या दिवसाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यासाठी सौ. क्षमा हर्डीकर यांनी मुलांना योगासनाचे फायदे व माहिती सांगितली तसेच रोजच योगा करावा यासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त केले. या दिनानिमित्त शाळेच्या काचफलकात मुलांनी काढलेले योगासनाचे तक्ते लावण्यात आले.

त्याचप्रमाणे योग दिनाचे औचित्य साधून माध्यमिक विभागात योग व मननाचा कार्यक्रम शाळेच्या क्रीडांगणावर पार पडला. सहजयोग संस्थेतर्फे सौ. राजश्री भालेकर व श्री. अनंत मानकर व त्यांचे सहकारी यांनी इ. ८वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास प्रभारी प्राचार्या सौ. नूतन बापट, पर्यवेक्षिका सौ. एव्हरील परेरा, उपमुख्याध्यापिका सौ. हेमांगिनी इनामदार उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन व पाहुण्यांची ओळख शिक्षक प्रतिनिधी सौ. विद्या सालेहित्तल यांनी करून दिली.

कु. सुखदा वैशंपायन (इ. १०वी ब) व कु. देवेन कालगावकर (इ. १०वी इ) या विद्यार्थ्यांनी योग दिनाचे व योगाचे महत्त्व सांगितले.

श्री. अनंत मानकर यांनी मननाचे महत्त्व विशद केले, तसेच शरीरातील ७ चक्रांचे कार्य व देवता या विषयी माहिती दिली. मन शांत ठेवण्यास व मन एकाग्र होण्यासाठी योगाचे कसे सहाय्य होते ते उलगडून सांगितले. कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाखाली मननाचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी ध्यान-मननाचा अनुभव घेतला.

इयत्ता ५वी ते ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी शाळेतच पर्यवेक्षिका सौ. सायली धाक्रस यांच्या मार्गदर्शनाखाली योग व त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांनी विशद केले व मननाचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. ***

विज्ञान महाविद्यालय, पुणे

कार्यवाह : प्रा. राजेंद्र सं. कांबळे

प्र. प्राचार्या : सौ. सुरेखा देशमुख

प्रवेश

शैक्षणिक वर्ष २०१७ - १८ साठी प्रथमवर्ष बी. एस्सी. संगणकशास्त्र, एम. एस्सी. संगणकशास्त्र व एम. सी. ए. (सायन्स) साठी निर्धारीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे प्रवेश देण्यात आले. बी. एस्सी. संगणकशास्त्राच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी ३५० विद्यार्थ्यांचे अर्ज आले होते. महाविद्यालयाच्या प्रवेश क्षमतेनुसार ८० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. पदव्युत्तर विभागातील प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा घेण्यात आली. महाविद्यालयातर्फे एम. एस्सी. संगणकशास्त्र प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी १२६ विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली. त्यातील गुणवत्तेनुसार निर्धारीत प्रवेश क्षमतेनुसार एम. एस्सी. संगणकशास्त्र - प्रथम वर्षासाठी ६० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. या वर्षीही प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला.

दि. १५ जून २०१७ पासून नवीन शैक्षणिक वर्ष उत्साहात सुरू झाले. पदवी विभागामध्ये बी. एस्सी. संगणकशास्त्र अभ्यासक्रमातील द्वितीय व तृतीय वर्षाची सुरुवात दि. २७ जून २०१७ पासून झाली. पदव्युत्तर विभागामध्ये एम. एस्सी. संगणकशास्त्र व एम. सी. ए. (विज्ञान) या अभ्यासक्रमाच्या सर्व वर्गांची सुरुवात दि. १ जुलै २०१७ पासून होईल.

शैक्षणिक वर्ष २०१६ - १७ चे निकाल

बी. एस्सी. (संगणकशास्त्र)

वर्ष	बसले	उत्तीर्ण	निकाल %	प्राविण्य / प्रथम वर्ग
प्रथम	८८	६६	७५	१२ / ११
द्वितीय	८०	७४	९२.५	९ / २३
तृतीय	७६	४५	५९.२	८ / १९

गुणानुक्रमे बी. एस्सी. (संगणकशास्त्र) अभ्यासक्रमामध्ये प्रथम आलेले विद्यार्थी

वर्ष	विद्यार्थ्याचे नाव	गुण %	क्रमांक
तृतीय	कु. वोरा सलोनी	८०.३३	प्रथम
	कु. कानडे सई	७७.३३	द्वितीय
	कु. कुलकर्णी प्रसाद	७६.५८	तृतीय
द्वितीय	कु. गोमाने पूजा	८७.०८	प्रथम
	कु. अगरवाल मयूरी	८३.०८	द्वितीय
	कु. कोकजे राहुल	८२.९२	तृतीय
प्रथम	कु. नागटिळक मीरा	९५.०८	प्रथम
	कु. धाईंजे रेवती	९१.०८	द्वितीय
	कु. ऋतुजा ढमढेरे	८२.१७	तृतीय

शैक्षणिक वर्ष २०१७ - १८ चे प्रवेश

अभ्यासक्रम	वर्ष	मंजूर विद्यार्थी संख्या	प्रवेशित विद्यार्थी संख्या
बी. एस्सी.	प्रथम	८०	८०
(संगणकशास्त्र)	द्वितीय	--	८१
	तृतीय	--	८०
एम. एस्सी.	प्रथम	६०	६०
(संगणकशास्त्र)	द्वितीय	--	६०
एम.सी. ए.	तृतीय	--	२३

आदर्श शिक्षक पुरस्कार

दि. १२ मे २०१७ रोजी पुणे विद्यार्थी गृहाच्या १०८ व्या वर्धापनदिनी विज्ञान महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र प्रमुख प्रा. सौ. रेखा जोशी यांना डॉ. काकासाहेब देवधर आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

योग दिन

युजीसी व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या आदेशानुसार दि. २१ जून २०१७ रोजी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' महाविद्यालयामध्ये संपन्न झाला. योग शिक्षक सौ. अनुपमा मिश्रा व श्री. स्वप्नील जावकर यांच्या

मार्गदर्शनाखाली योग शिबिराचे आयोजन महाविद्यालयामध्ये करण्यात आले. त्या अंतर्गत सूक्ष्म व्यायाम, योगासनाचे विविध प्रकार, सूर्यनमस्कार, प्राणायामाचे काही प्रकार तसेच ध्यान धारणा इत्यादींचे प्रात्याक्षिक उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले. त्यानंतर सौ. अनुपमा मिश्रा यांनी योगाचे महत्त्व विशद केले. श्री. स्वप्नील जावकर यांनी सूर्यनमस्काराचे महत्त्व सर्वांना पटवून दिले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांचे शंका निरसन करुन कार्यक्रमाची सांगता झाली.

प्लेसमेंट सेल

प्लेसमेंट ॲक्टिव्हिटी अंतर्गत महाविद्यालयामध्ये विविध आयटी कंपनींना आमंत्रित करण्यात येते. यामध्ये शैक्षणिक वर्ष २०१६ - १७ साठी माहे जून मध्ये झालेल्या ॲक्टिव्हिटीचा तपशील पुढील प्रमाणे -

कंपनीचे नाव	पदव्युत्तर अभ्यासक्रम एम. एस्सी. (संगणकशास्त्र) एम. सी. ए. (विज्ञान) निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या
1) Omnisient Technologies	०१
2) Spring Computing Technologies	०५
3) Harbinger	०२

✻

शिशुनिकेतन मराठी माध्यम पुणे

कार्यवाह : प्रा. राजेंद्र संपत कांबळे
प्र. मुख्याध्यापिका : सौ. अरुणा कांबळे

दि. १५ जून २०१७ रोजी शाळेचा पहिला दिवस असल्यामुळे वातावरणामध्ये प्रसन्नता, उत्साह होता.

संस्थेच्या धुर्नधारी श्रीराम मंदिरामध्ये मुलांच्या स्वागतासाठी रांगोळी, आरास व फुग्यांची सजावट केली होती. मुलांसाठी शालेय साहित्याचे व सर्वशिक्षा अभियांनामार्फत मिळालेली पाठ्यपुस्तके मांडण्यात आली होती.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे श्री. आनंद सराफ व बालक संस्थेच्या श्रीमती वडापूरकर आणि सौ. तांबे या उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. पाहुण्यांच्या हस्ते धनुर्धारी श्रीराम व लक्ष्मण यांच्या मूर्तींना हार घालण्यात आला. मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्याचे स्वागत श्रीफल देऊन करण्यात आले.

आपल्या खुमासदार भाषणामध्ये श्री. आनंद सराफ यांनी बालपणापासूनचे आपले विविध अनुभव कथन केले. पैशाच्या श्रीमंतीपेक्षा मनाची श्रीमंती खूप मोठी आहे. धुणी - भांडी करणाऱ्या, मोलमजुरी करुन आपल्या मुलांचे भविष्य उज्ज्वल करणाऱ्या आई-वडिलांना कधीच विसरू नका असा मोलाचा संदेश त्यांनी देऊन त्यांनी मुलांना व पालकवर्गाला आपलेसे केले. यानंतर मुलांना पाहुण्यांच्या हस्ते शालेय पुस्तके व साहित्याचे वाटप करण्यात आले. मुलांना चॉकलेट - बिस्टिके असा खाऊ देण्यात आला.

सौ. मुंगळे यांनी आभारप्रदर्शन केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगती झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. नूतन मोरे यांनी केले. सौ. जगरवाल, सौ. हंबीर, सौ. ताम्हणकर, कु. रेश्मा, श्री. सावंत या सर्व शिक्षकांनी कार्यक्रमास सहकार्य केले.

आंतरराष्ट्रीय योग दिन

बुधवार दि. २१.६.२०१७ रोजी सकाळी ८ ते ९ या वेळेमध्ये धनुर्धारी श्रीराम मंदिरामध्ये आतंरराष्ट्रीय योगदिनानिमित्त मुलांची योगासने घेण्यात आली. बालक संस्थेच्या श्रीमती वडापूरकर व त्यांचे सहकारी यांनी ओंकाराचा अर्थ, त्याची व्याप्ती, योगासनांचे महत्त्व विषद केले.

मुलांकडून गरुडासन, ताडासन, चक्रासन, वज्रासन, भुजंगासन इ. आसनांचे प्रकार करुन घेण्यात आले. शेवटी शांतीपाठ झाला. प्राणायाम व ओंकार झाले. मुलांना बिस्किटांचा खाऊ देऊन कार्यक्रमाची सांगती झाली.

✻✻✻

विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,नेरूळ,नवी मुंबई शाखा

कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे
संचालक : श्री. दिनेश पि. मिसाळ
संचालक : डॉ. शं. पां. किंजवडेकर

विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

माध्यमिक शालांत परीक्षा निकाल (एसएससी) मार्च २०१७

मार्च २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत परीक्षेसाठी ५२ विद्यार्थी बसले होते. विभागाचा निकाल १००% लागला.

विद्यार्थ्यांची नावे	गुण	क्रमांक
कु. आदेश सहदेव चौधर	९५.६०%	प्रथम
कु. तेजस्विनी मनोहर मंदाडकर	९३.२०%	द्वितीय
कु. संजना श्रीकांत गटे	९०.६०%	तृतीय

विद्यालयाचा एकत्रित निकाल खालील प्रमाणे

९०% पेक्षा जास्त	०३ विद्यार्थी
विशेष प्राविण्यासह	१९ विद्यार्थी
प्रथम श्रेणी	२२ विद्यार्थी
द्वितीय श्रेणी	०५ विद्यार्थी
पास	०३ विद्यार्थी
एकूण	**५२ विद्यार्थी**

विद्याभवन माध्यमिक मराठी

माध्यमिक शालांत परीक्षा निकाल मार्च २०१७

मार्च २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत परीक्षेसाठी ६९ विद्यार्थी बसले होते. विभागाचा निकाल १००% लागला

विद्यार्थ्यांची नावे	गुण	क्रमांक
कु. मानसी जयसिंग थोरात	९३.४०%	प्रथम
कु. हर्षाली दिलीप पाटील	८९.८०%	द्वितीय
कु. कार्तिक वसंत रासकर	८८.६०%	तृतीय

विद्यालयाचा एकत्रित निकाल खालील प्रमाणे

विशेष प्राविण्यासह	३२ विद्यार्थी
प्रथम श्रेणी	३१ विद्यार्थी
द्वितीय श्रेणी	०६ विद्यार्थी
एकूण	**६९ विद्यार्थी**

माध्यमिक इंग्रजी
मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ

प्रवेश दिन

दि. १५ जून २०१७ रोजी विद्याभवन शाळेच्या सभागृहात पहिल्या दिवशी नव्याने प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा केला. या प्रसंगी इंग्रजी माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ व सर्व शिक्षकवृंद यांनी नव्याने प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना गुलाबाचे फूल व चॉकलेट देऊन स्वागत केले संगीतमय उल्हासित वातावरणात नवीन विद्यार्थ्यांनी प्रवेश केला.

शिक्षणमहर्षी गीतातज्ज्ञ गुरुवर्य अण्णासाहेब खैर जयंती

शाळेचा पहिला दिवस नव्याने प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत व संस्थेचे संवर्धक गुरुवर्य अण्णांची जयंती हा योगायोगच म्हणावा लागेल. या कार्यक्रमाला संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचा शुभारंभ संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी गुरुवर्य अण्णांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन केला. मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ यांनी संचालक श्री. दिनेश मिसाळ यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. श्रीमती सायरा टोले यांनी अण्णांच्या जीवनाविषयी संक्षिप्त माहिती दिली. श्रीमती पौर्णिमा खरजे यांनी अण्णांविषयी थोडक्यात माहिती दिली. श्रीमती फरहाना चौगुले यांनी अण्णांच्या शैक्षणिक कार्याची माहिती दिली. या कार्यक्रमाचे औचित्य साधून संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज केले. त्यांनी अण्णासाहेब खैर व दादासाहेब केतकर यांच्या विचारांचा वारसा आपण पुढे चालवू असे

विद्याभवन कनिष्ठ महाविद्यालय, नेरुळ इ. १२ वी निकाल विज्ञान शाखा

कु. लंके हरीष बजाभाऊ
प्रथम ८२.६२%

कु. मोहिते ऋणाल संजय
द्वितीय ७३.२३%

कु. गायकवाड सिजय संजय
तृतीय ७२.७७%

विद्याभवन कनिष्ठ महाविद्यालय, नेरुळ इ. १२ वी निकाल वाणिज्य शाखा

कु. जाधव नेहा दत्तात्रय
प्रथम ८९.४७%

कु. सिंग किरण अंतू
द्वितीय ८५.२३%

कु. गोळे भाग्यश्री मनोहर
तृतीय ८४.७७%

विद्याभवन माध्यमिक इंग्रजी, नेरुळ इ. १० वी निकाल

कु. चौधर आदेश सहदेव
प्रथम ९५.६०%

कु. मंदाडकर तेजस्विनी मनोहर
द्वितीय ९३.२०%

कु. गटे संजना श्रीकांत
तृतीय ९०.६०%

विद्याभवन माध्यमिक मराठी, नेरुळ इ. १० वी निकाल

कु. थोरात मानसी जयसिंग
प्रथम ९३.४०%

कु. पाटील हर्षाली दिलीप
द्वितीय ८९.८०%

कु. रासकर कार्तिक वसंत
तृतीय ८८.६०%

सांगितले. विद्यार्थ्यांना अण्णांचा दूरदर्शी दृष्टीकोन समजावून सांगितला. दोन तपस्वी पुस्तक जरुर वाचण्याचे विद्यार्थ्यांना सांगितले, त्यामुळे आयुष्यात योग्य दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रेरणा मिळेल. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्री. जगन्नाथ कोळी यांनी केले. अशा प्रकारे शाळेच्या पहिल्या दिवसाची सुरुवात शिक्षणमहर्षी गीतातज्ज्ञ गुरुवर्य अण्णांच्या जयंतीने उत्साहात करण्यात आली.

आंतरराष्ट्रीय योग दिन

दि. २१ जून २०१७ रोजी माध्यमिक इंग्रजी विभागाने आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी सौ. जयश्री परांजपे, सौ. उर्मिला लामखाडे आणि श्री मुकुंद काळे (योगसाधन केंद्र, खारघर) हे उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ यांनी पुष्पगुच्छ देऊन अतिथींचे स्वागत केले. सौ. उर्मिला लामखेडे व श्री मुकुंद काळे यांनी योग दिनानिमित्ताने विद्यार्थ्यांकडून प्राणायाम, पद्मासन, वृक्षासन अशी विविध योगासने व प्रात्यक्षिके करवून घेतली. सौ. जयश्री परांजपे यांनी विद्यार्थ्यांना योगाचे जीवनातील महत्व पटवून दिले. क्रीडा शिक्षक श्री सुहास राऊळ यांनी योगदिना निमित्त विद्यार्थ्यांकडून संकल्प करवून घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन श्री सुहास राऊळ यांनी केले. शान्ती पाठाने कार्यक्रमाची सांगता झाली.

अभिनंदनीय

✻ शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये बृहन्मुंबई निम्नस्तर मराठी शिक्षक संघटनेद्वारा घेण्यात आलेल्या आंतरशालेय निम्नस्तर मराठी परीक्षेत कु. तेजस्विनी मनोहर मांदाडकर इ.१० वी या विद्यार्थिनीने मुंबई विभागामध्ये द्वितीय क्रमांक पटकविला.

✻ दि. २५ जून २०१७ रोजी आर्य समाज पंजाबी सभा यांच्या संयुक्त कार्यक्रमासाठी उपस्थित प्रमुख अतिथी श्री. जोस कूरियन आणि अध्यक्ष श्री. हरजिंदरसिंह सैनी यांचे मार्फत नेरुळ मधील माध्यमिक शालांत परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या कु. आदेश सहदेव चौधर आणि कु. तेजस्विनी मनोहर मांदाडकर या विद्यार्थ्यांचा स्मृतिचषक देऊन गौरव करण्यात आला.

प्राथमिक इंग्रजी
मुख्याध्यापिका सौ. मनिषा मुळिक

प्रवेश दिन

दि. १५ जून २०१७ या दिवशी विद्याभवन शाळा नेरुळ येथे प्राथमिक इंग्रजी विभागाचा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी मुख्याध्यापिका सौ. मनिषा मुळीक व शिक्षक उपस्थित होते. सौ. मनिषा मुळीक यांनी विद्यार्थ्यांना चॉकलेट देऊन त्यांचे स्वागत केले. तसेच त्यांना शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. या दिवशी स्वागत फलक लिहून स्वागत गीतही लावण्यात आले होते. अशाप्रकारे संगीतमय वातावरणात अतिशय जल्लोषात विद्यार्थ्यांनी शाळेच्या पहिल्या दिवसास सुरुवात केली.

माध्यमिक मराठी
मुख्याध्यापिका सौ. विजया गणेश

विद्याभवन नेरुळ शाखेचा वर्धापन दिन

दि. १७ जून २०१७ (नेरुळ) पुणे विद्यार्थी गृहाच्या विद्याभवन नेरुळ शाखेचा १६ वा वर्धापन दिन १७ जून (शनिवार) रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागाचे अध्यक्ष व शिक्षक आमदार मा. श्री. बाळाराम पाटील हे या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच कर्नाळा नागरी सह. बँकेचे व्हा. चेअरमन श्री. सुभाष देशमुख व श्री. उमाकांत राऊत तसेच संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर, श्री. दिनेश मिसाळ व चारही विभागाच्या मुख्याध्यापिकांची कार्यक्रमाला उपस्थिती होती. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी प्रास्ताविक सादर केले व नेरुळ शाखेची स्थापना व आजपर्यंतची प्रगती याबाबतची माहिती देऊन शाळेच्या तिसऱ्या मजल्याच्या बांधकामासाठी मदतीचे आवाहन केले. सदर प्रसंगी इ.१०वी व १२वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच मातोश्री मुक्ताबाई फणसे व निर्मल भोजने शिष्यवृत्ती शाळेतील २० गरीब, गरजू व हुशार मुलांना प्रदान करण्यात आली.

श्रीमती नूतन गवांदे यांनी शाळेविषयी सुंदर कविता सादर केली. प्रमुख अतिथी मा. श्री. बाळाराम पाटील यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व शाळेचे भरभरुन कौतुक केले. शिक्षक आमदार म्हणून निवडून येण्यासाठी शिक्षकांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले व भविष्यामध्ये नेहमी मदतीस धावून येण्याचे आश्वासन दिले. अध्यक्षीय भाषणात डॉ. शं. पां. किंजवडेकर यांनी विद्यार्थ्यांना आदर्श विद्यार्थी कसा असावा हे सांगून आदर्श नागरीक बनण्याचे आवाहन केले व शाळेच्या वाढीसाठी शिक्षक, पालक व मान्यवरांना सर्वतोपरी मदत करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सुजय वाबळे यांनी केले तर श्रीमती प्रेमलता बिस्ट यांनी आभारप्रदर्शन केले. वर्धापन दिनाचे औचित्य साधून जेष्ठ माजी विद्यार्थी श्री. चि. त्र्यं. मराठे यांनी आपल्या मुलासह शाळेला भेट दिली. त्यांनी संस्थेमध्ये शिकत असतानाच्या आपल्या आठवणींना उजाळा दिला व विशेष म्हणजे त्यांनी शाळेच्या तिसऱ्या मजल्याच्या बांधकामासाठी १ लाख रुपयांची देणगी देखील दिली. संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर यांनी त्यांचे आभार मानले. अशाप्रकारे मोठ्या उत्साहात शाळेच्या १६ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

प्राथमिक मराठी
मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ

प्रवेशोत्सव

दि. १५ जून २०१७ रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी विभागाचा विद्यार्थी प्रवेशोत्सव मोठ्या आनंदी वातावरणात उत्साहाने साजरा करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ यांच्या शुभहस्ते सर्वांना चॉकलेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले व नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

गुरुवर्य डॉ अण्णासाहेब खैर जयंती

दि. १५ जून २०१७ रोजी गुरुवर्य डॉ. अण्णासाहेब खैर यांची ११९वी जयंती उत्साहात साजरी केली. संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर यांच्या शुभहस्ते गुरुवर्य डॉ. अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी गुरुवर्य अण्णासाहेबांचे विचार आपल्या भाषणातून सांगितले. संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर व श्री. दिनेश मिसाळ यांनी सुध्दा अण्णासाहेबांविषयीची माहिती, यांचे विचार, विद्यार्थ्यांनी शिकून खूप मोठे व्हावे म्हणून असणारी त्यांची धडपड या विषयाची माहिती दिली. विद्यार्थ्यांना संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर व श्री. दिनेश मिसाळ यांच्या शुभहस्ते मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री अविनाश कुलकर्णी यांनी केले.

१६ वा वर्धापन दिन

कार्यक्रमाच्या सुरुवातीस गणेशपूजन व सरस्वतीपूजन करण्यात आले. त्यानंतर माध्यमिक मराठी विभागाच्या विद्यार्थिनींनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी आपल्या प्रास्ताविकातून संस्थेच्या कार्याची माहिती स्पष्ट केली. त्यानंतर प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते शाळेतील एम.टी.एस., एस.एस.सी व एच.एस.सी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर यांनी आपल्या भाषणातून शाळेच्या १०० टक्के निकालाची परंपरा कायम असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. वाबळे यांनी केले.

आंतरराष्ट्रीय योग दिन

दि. २१ जून २०१७ रोजी प्राथमिक मराठी विभागाने आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. योगदिनानिमित्त संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर, मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ व सौ. विजया गणेश, सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस माध्यमिक मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी व नंतर प्राथमिक मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी सुरेख अशी योगासने व सूर्यनमस्कार सादर केले. त्यानंतर संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर यांनी आपल्या भाषणातून योग

दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. तसेच योगाचे मानवी जीवनातील महत्व सांगून सर्वांनी आपले शरीर निरोगी ठेवण्यासाठी दररोज योगसाधना करावी असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती नूतन गवांदे यांनी केले.

मोफत शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम

दि. २३ जून २०१७ रोजी पुणे विद्यार्थी गृहाचे ज्येष्ठ माजी विद्यार्थी श्री. ल. दि. कुलकर्णी, श्री. श्रीकांत कुलकर्णी व श्री. राहुल वाळिंबे यांनी विद्याभवन प्राथमिक मराठी व इंग्रजी विभागातील एकूण पन्नास गरीब, गरजू व हुशार विद्यार्थ्यांना मोफत वह्या, पेन, कंपास व इंग्रजी मराठी शब्दकोशाचे वाटप केले. या कार्यक्रमाप्रसंगी संचालक डॉ. श्री. शं. पां. किंजवडेकर यांनी सुरुवातीला श्री. ल. दि. कुलकर्णी, श्री. श्रीकांत कुलकर्णी व श्री. राहुल वाळिंबे यांचे श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांनी मिळालेल्या शैक्षणिक साहित्याचा चांगला उपयोग करुन गुणवत्ता वाढवून शाळेचे नाव उज्वल करावे असे सांगितले. श्री. श्रीकांत कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात वेगवेगळी कौशल्ये प्राप्त करावीत त्याचा भविष्यात नक्की उपयोग होतो असे सांगितले. त्यानंतर श्री. ल. दि. कुलकर्णी यांनी शाळेने विद्यार्थ्यांची सेवा करण्याची संधी दिली त्याबद्दल शाळेचे व संस्थेचे आभार मानले. संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर यांनी विद्यार्थ्यांनी चांगले शिकून खूप मोठे व्हावे. त्याबरोबर आपल्या शाळेचे नाव मोठे करावे असे सांगून श्री. ल. दि. कुलकर्णी व श्री. श्रीकांत कुलकर्णी यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप केल्याबद्दल त्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका सौ. कविता तेंडुलकर यांनी केले.

विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

महाकवी कालिदास दिनानिमित्त काव्यधारा

दि. २४ जून २०१७ रोजी महाकवी कालिदास दिनानिमित्त काव्यधारा या काव्यवाचनाच्या कार्यक्रमाचे आयोजन उच्च माध्यमिक विभागामध्ये करण्यात आले. मुख्याध्यापिका श्रीमती विजया गणेश यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम पार पडला. विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील स्वरचित व संकलित कवितांचे वाचन केले तसेच शिक्षकांनी देखील विविध नामवंत कवींच्या विविध विषय व आशयाच्या कविता सादर केल्या. प्राथमिक विभागातून श्रीमती नूतन गवांदे यांनी मायलेकीच्या नात्यांवर आधारित स्वरचित कविता सादर केली. पाऊस, पर्यावरण, कॉलेज जीवन, आई, वडील, प्रेम, अशा विविध विषयाच्या कविता वाचण्याचा आनंद सर्वांनी घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सुजय वाबळे यांनी केले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या व शाळेच्या वतीने हार्दिक अभिनंदन ! ***

सबंध पुस्तकात पक्षिवर्गाविषयी प्रथम सर्वसामान्य माहिती देऊन नंतर लेखकाने प्रत्यक्ष पाहिलेल्या, निरीक्षिलेल्या अशा सुमारे सत्तर पक्ष्यांची माहिती या पुस्तकात पक्ष्यांच्या रंगीत फोटोंसह दिलेली आहे

पक्षिविज्ञान

(Birds' Life)

डॉ. वि. ना. गोखले

पीएच्. डी., डी. आय. सी. (लंडन)

मूल्य १५०/- रुपये

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन

१७८६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर, मुंबई शाखा

ज्येष्ठ संचालक : प्राचार्य के. एन. शिरकांडे
कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे
संचालक : श्री. दिनेश पि. मिसाळ

विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय
मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार

इ. ५वी - प्रवेशोत्सव - १५ जून २०१७

गुरुवार दि. १५ जुन २०१७ रोजी पुणे विद्यार्थी गृहाच्या विद्याभवन संकुलामध्ये इंग्रजी व मराठी माध्यमाच्या इ. ५वी च्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव मोठया आनंदात पार पडला. 'सकाळ माध्यम समूह' आणि संकल्प सेवा संघ यांच्यातर्फे गुलाब पुष्प व सकाळचा अंक देऊन स्वागत करण्यात आले.

संकल्प सेवा संघाचे अध्यक्ष मा .श्री. विनायक कामथ, सचिव श्री. राजेंद्र पिसे, महिला अध्यक्ष, श्रीमती वंदना पिसे, लायन श्रीमती विजया जगदाळे, डॉ. सुप्रिया पाध्ये इ. मान्यवरांच्या हस्ते सर्व शिक्षा अभियानांतर्गत प्राप्त शालेय पाठयपुस्तकांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करताना टीव्ही वरील हिंसक, असंस्कृत कार्यक्रम न पाहता करमणूक, शास्त्रीय तसेच प्रबोधन करणारे कार्यक्रम पाहण्याचे आवाहन केले. कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी आयोजकांचे आभार मानले. मुख्याध्यापिका सौ. योगिनी पोतदार (मराठी माध्यम) यांनी प्रवेशोत्सवाचे प्रास्ताविक केले. श्रीमती उमा गोपालकृष्ण मुख्याध्यापिका (इंग्रजी माध्यम) शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीत प्रवेशोत्सव मोठया उत्साहात पार पडला.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र निकाल : इयत्ता १२ वी : विज्ञान शाखा :

शैक्षणिक वर्ष २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी २०१७ विद्याभवन कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर विज्ञान शाखेमधून एकूण १६३ विद्यार्थी प्रविष्ट झाले. त्यापैकी १४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ५ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले. तर ४८ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळविली. विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९१.४१% एवढा लागला.

गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी पुढीलप्रमाणे.

क्रमांक	विद्यार्थ्याचे नाव	गुण %
प्रथम	कु. जैन रुचीर संजय	८३.६९
द्वितीय	कु. चौधरी हितेश दोलाराम	७८.९२
तृतीय	कु. मेश्राम तेजस प्रकाश	७८.१५

विषयनिहाय निकाल पुढीलप्रमाणे

विषय	विद्यार्थ्याचे नाव	प्राप्त गुण १०० पैकी
इंग्रजी	कु. सावंत सुशांत सुरेश	८६
मराठी	कु. कदम ऋषिकेश हनुमंत	८८
हिंदी	कु. पवार नेहा आनंद	९१
	कु. नारायणे अंजली नरेंद्र	९१
	कु. मेश्राम तेजस प्रकाश	९१
गणित	कु. जैन रुचीर संजय	८६
भौतिक शास्त्र	कु. जैन रुचीर संजय	९०
रसायनशास्त्र	कु. जैन रुचीर संजय	८८
जीवशास्त्र	कु. सावंत सुशांत सुरेश	९१

द्विलक्षी अभ्यासक्रम विभाग

शैक्षणिक वर्ष २०१७ फेब्रुवारी मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत विद्याभवन कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर द्विलक्षी अभ्यासक्रम विभागातून एकूण ९४ विद्यार्थी प्रविष्ट झाले. त्यापैकी ९० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. द्विलक्षी अभ्यासक्रम विभागाचा एकूण निकाल ९५.७४% एवढा लागला. गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी पुढीलप्रमाणे.

क्रमांक	विद्यार्थ्याचे नाव	गुण %
प्रथम	कु. मोहिते मानस मुकुंद	७३.८५
	कु. कांबळी श्लोक प्रदीप	७३.८५
द्वितीय	कु. सारंग सायली घनःश्याम	७२.३१
तृतीय	कु. केदारी चैतन्या संतोष	७२.१५

घाटकोपर विद्याभवन

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१७ विज्ञान शाखा

कु. जैन रुचीर संजय
८३.६९%

कु. चौधरी हितेश दोलाराम
७८.९२%

कु. मेश्राम तेजस प्रकाश
७८.१५%

द्विलक्षी अभ्यासक्रम प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१७

कु. मोहिते मानस मुकुंद
७३.८५%

कु. कांबळी श्लोक प्रदीप
७३.८५%

कु. सारंग सायली घनश्याम
७२.३१ %

कु. केदारी चैतन्य संतोष
७२.१५%

विद्याभवन नं. २ इंग्रजी माध्याम प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१७ विज्ञान शाखा

कु. शेवाळे गौरी विद्याधर
९९.००%

कु. बागवे ऋग्वेदा राजन
९७.६०%

कु. कोंडुसकर सिद्धांत रमेश
९६.२०%

माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१७

कु. सूर्यवंशी आकांक्षा
९४.६०%

कु. देसाई प्रतिक
९४.४०%

कु. जरे सर्वेश
९३.६०%

कु. ककुरले साहिल
९३.६०%

विषयनिहाय निकाल पुढीलप्रमाणे -

विषय	विद्यार्थ्याचे नाव	गुण
इंग्रजी	कु. रिझवी हसन मेहदी मोहमद मेहदी	८१/१००
गणित	कु. फडाले ऋषिकेश सु.	७१/१००
भौतिकशास्त्र	कु. सारंग सायली ध.	७४/१००
रसायनशास्त्र	कु. वंडेकर शुभम अ.	७२/१००
संगणकशास्त्र	कु. झकारिया निखिल	१७०/२००
कनकशास्त्र	कु. कांबळी श्लोक प्र.	१७७/२००

विज्ञान शाखा आणि द्विलक्षी अभ्यासक्रम विभागाचा एकत्रित निकाल

शैक्षणिक वर्ष २०१७ फेब्रुवारी मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत विद्याभवन कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर विज्ञान शाखा आणि द्विलक्षी अभ्यासक्रम विभागातून एकूण २५७ विद्यार्थी प्रविष्ट झाले त्यापैकी २३९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ५ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले. तर ७७ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळविली. महाविद्यालयाचा एकूण निकाल ९२.९९% एवढा लागला.

योगदिन २१ जून

दि. २१ जून २०१७ रोजी विद्याभवन प्रशालेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. उपमुख्याध्यापिका सौ. सुरेखा लअुळकर यांनी योगाचे महत्त्व सांगितले. भारतीय योग ही शरीर मन आणि आत्मा यांना आरोग्य देणारी पद्धती आहे. म्हणून त्याग, तपस्या, प्रेमाने सर्वांना समजुन घेऊन सामाजिक बांधिलकीचा वसा घेवूया असे त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले.

इंग्रजी माध्यमाचे सहा. शिक्षक श्री. ज्ञानेश्वर धुमाळ यांनी विविध योगासनांची माहिती देऊन प्रत्यक्ष आसने करुन दाखविली. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आसनांचे काही प्रकार सादर केले. उपस्थित विद्यार्थ्यांनी प्राणायाम व आसनांचे प्रकार केले. योगदिनाचे औचित्य साधून या दिवशी मैदानावर योगासनाचे विविध प्रकार करुन घेतले गेले.

प्रशालेतील एकंदरीत २०० विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा लाभ घेतला. या कार्यक्रमात प्रशालेच्या मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका, शिक्षक वृंद इ. सर्वांनी भाग घेतला.

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा - २०१७ : माध्यमिक मराठी विभाग

मार्च २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा मराठी माध्यमाचा निकाल १००% लागला. या परीक्षेत एकूण १५२ विद्यार्थी बसले होते. १८ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळविले. ८२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले. प्रथम श्रेणी ५७ विद्यार्थ्यांना तर द्वितीय श्रेणी १२ विद्यार्थ्यांनी प्राप्त केली. १ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणी.

गुणनुक्रमे पहिली तीन विद्यार्थी पुढील प्रमाणे

क्रमांक	विद्यार्थ्याचे नाव	गुण %
प्रथम	कु. सुर्यवंशी आकांक्षा विलास	९४.६०
द्वितीय	कु. देसाई प्रतिक बाळासाहेब	९४.४०
तृतीय	कु. ककुरले साहिल वैजनाथ	९३.६०
	कु. जरे सर्वेश श्रीधर	९३.६०

विद्याभवनं नं. २
मुख्याध्यापिका सौ. उमा गोपालकृष्णन

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा - २०१७ : माध्यमिक इंग्रजी विभाग

मार्च २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा इंग्रजी माध्यमाचा निकाल १००% लागला. या परीक्षेस एकूण १९८ विद्यार्थी बसले होते. ३० विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवले. ७४ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले. प्रथम श्रेणी ५८ विद्यार्थ्यांना, तर द्वितीय श्रेणी ३६ विद्यार्थ्यांनी प्राप्त केली.

गुणनुक्रमे पहिली तीन विद्यार्थी पुढील प्रमाणे

क्रमांक	विद्यार्थ्याचे नाव	गुण %
प्रथम	कु. शेवाळे गौरी विद्याधर	९९.००
द्वितीय	कु. बागवे ऋग्वेदा राजन	९७.६०
तृतीय	कोंडुसकर सिद्धांत रमेश	९६.२०

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा - २०१७ : विद्याभवन नं.२ माध्यमिक मराठी विभाग

मार्च २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा इंग्रजी माध्यमाचा निकाल ९८.४४% लागला. या परीक्षेत एकूण ६४ विद्यार्थी बसले होते. १२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले. प्रथम श्रेणी २५ विद्यार्थ्यांना तर द्वितीय श्रेणी २१ विद्यार्थ्यांनी प्राप्त केली. तृतीय श्रेणी ५ विद्यार्थ्यांनी प्राप्त केली.

क्रमांक	विद्यार्थी	गुण%
प्रथम	कु. गरुड अंकिता रविंद्र	८८.६०
द्वितीय	कु. शिंदे संतोष काशिराम	८७.००
तृतीय	कु. चावरे अभिजित दिलीप	८६.००

***

पुणे विद्यार्थी गृह, माजी विद्यार्थी महामंडळ

महामंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी महामंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि.१२ मे २०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता, पुणे विद्यार्थी गृह मुख्यालय, राम मंदिर, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे झाली. सभेला ३३ माजी विद्यार्थी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्रा. के. एन. शिरकांडे होते.

सभेपुढील विषय :-

१. मागील सभेचे इतिवृत्त वाचन व मंजुरी.
२. सन २०१६-१७ या वर्षाचा अहवाल वाचन व मंजुरी
३. सन २०१६-१७ या वर्षाचा आर्थिक वर्षाचा ताळेबंद मंजुरी.
४. सन २०१७- १८ या वर्षातील कार्यक्रमाचे नियोजन
५. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प मंजुरी
६. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय

१. कोषपाल श्री. म. अ. जोशी यांनी सभेची सूचना वाचून दाखविली.

२. श्रध्दांजली :- महामंडळाचे आश्रयदाते ॲड. मा. पां. फणसे यांचे दि. १ मार्च २०१७ रोजी निधन झाले. त्यांनी महामंडळाकडे दिलेल्या व आश्वासित केलेल्या शिष्यवृत्त्यांचा व देणगीचा उल्लेख कोषपालांनी केला. सर्वांनी त्यांना श्रध्दांजली वाहिली.

३. मागील सभेचे कार्यवृत्त :- मागील सभेचे कार्यवृत्त वाचून मंजूर करणे.

१) सहसविच श्री. दिनेश मिसाळ यांनी ११ मे २०१६ रोजी झालेल्या मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले व ते सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

२) उपाध्यक्ष प्रा. श्री. अ. पाटणकर यांनी वार्षिक अहवाल वाचून दाखविला, तो मंजूर करण्यात आला.

दि. ३१ मार्च २०१७ अखेरचा ताळेबंद वाचून दाखविला. त्यास सर्वांनी मान्यता दिली.

महामंडळाचे लेखा परीक्षण केलेले २०१६-१७ च्या लेख्यांना (उत्पन्न, खर्च तक्ता व ताळेबंद) मंजुरी देण्यात आली.

विषय ४) कोषपाल श्री. म. अ. जोशी यांनी सन २०१७-१८ चा अर्थसंकल्प सादर केला.

विषय अ) श्री. रघुनाथ ढोक, श्री. विक्रम शिंदे, सहसचिव श्री. दिनेश मिसाळ, श्री. अमोल जोशी डॉ. पुरंदरे यांनी मंडळाची सदस्य संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचे सांगितले.

विषय क) उपाध्यक्ष प्रा. पाटणकर यांनी असे सांगितले की मागील सभेमध्ये काही माजी विद्यार्थ्यांनी आश्रयदाते होण्याचे आश्वासन दिले होते. परंतु त्यांनी अद्यापही आश्वासनाची पूर्तता केली नाही. त्यांनी त्वरित आश्रयदाते सभासद व्हावे अशी सूचना केली.

आयत्या वेळच्या विषयामध्ये चांदेगाव येथील प्रकल्पाचा उल्लेख करण्यात आला. श्री. आनंद कुलकर्णी यांनी आतापर्यंतच्या प्रगतीची माहिती दिली.

श्री. सुभाष जिर्गे यांनी सांगितले की, मुक्तांगण शाळेतील निवासी विद्यार्थ्यांचा व कुटुंबियांचा एक मेळावा दि. २६ फेब्रुवारी २०१७ रोजी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात घेण्यात आला होता.

कार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे यांनी संस्थेने घेतलेल्या कर्जाची मोठ्या प्रमाणात परत फेड केली असल्याचे सांगून संस्थेने गेल्या वर्षाभरात केलेल्या प्रगतीची / कार्याची माहिती दिली व संस्थेच्या भावी योजनांबाबतही काही माहिती देऊन यासाठी सर्व माजी विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावेत असे आवाहन केले. संस्थेचे माजी कार्यवाह कै. विठ्ठल लिखिते यांचे चिरंजीव श्री. सिध्दार्थ लिखिते यांनी लंडन येथील कार्यक्रमात संस्थेचा परिचय व माहिती करुन देऊन संस्थेच्या मदतीसाठी आवाहन केल्याचे सांगितले.

याबाबत श्री. अमोल जोशी म्हणाले की आमचेकडे रु ५०,००० पासूनचे प्रकल्प तयार आहेत. त्यासाठी देणग्या घेता येतील.

सभेच्या कामकाजाचा समारोप करताना प्रा. पाटणकर यांनी १९४८ च्या माजी विद्यार्थ्यांच्या तुकडीचा कित्ता इतरांनी गिरवावा अशी सूचना केली.

सभा ठीक २:०० वाजता संपल्याचे अध्यक्षांनी जाहीर करुन उपस्थितांचे आभार मानले.

प्रा. कृ. ना. शिरकांडे
अध्यक्ष

श्री. म. अ. जोशी
कोषपाल

डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ–नाशिक

संचालक : श्री. संजय गुंजाळ

प्र. मुख्याध्यापिका : सौ. सोनिया राजवाडे

इयत्ता १२ वी निकाल

दि. ३० मे २०१७ रोजी इयत्ता इ. १२ वी चा निकाल जाहिर झाला. विज्ञान शाखेचा निकाल ९५% लागला. वाणिज्य शाखेचा निकाल ९४% लागला. प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे.

शाखा	विद्यार्थ्याचे नाव	गुण %	क्रमांक
विज्ञान	कु. वेदान्त शहा	८०.४६	प्रथम
	कु. श्रद्धा दुसाने	७०.७६	द्वितीय
	कु. जय भावसार	६९.८४	तृतीय
वाणिज्य	कु. पुजा पटेल	७६.७६	प्रथम
	कु. तृप्ती गांगुर्डे	७५.००	द्वितीय
	कु. नंदिनी नेरकर	७३.००	तृतीय

इयत्ता १० वी निकाल

दि. १३ जून २०१७ रोजी इ. १० वी चा निकाल जाहिर झाला. विद्यालयाचा निकाल १००% लागला. प्रथम पाच क्रमांक प्राप्त विद्यार्थिनी पुढील प्रमाणे-

विद्यार्थिनीचे नाव	गुण %	क्रमांक
कु. वैदेही खलाणे	९४.८०	प्रथम
कु. श्रुती नांद्रे	९४.२०	द्वितीय
कु. अस्मिता बरडिया	९३.८०	तृतीय
कु. वृणाली मग्जी	९२.४०	चतुर्थ
कु. यशदा निकम	९२.००	पंचम

कु. अस्मिता बरडिया हिने गणित विषयामध्ये व कु. पवन बोडके याने विज्ञान विषयामध्ये १०० पैकी १०० गुण मिळविले. संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कुलसचिव श्री. सुनील रेडेकर, ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले, संचालक श्री. कृष्णाजी कुलकर्णी, श्री. अमोल जोशी, डॉ. निहार वाळिंबे व श्री. संजय गुंजाळ तसेच प्र. मुख्याध्यापिका सौ. सोनिया राजवाडे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांनी **सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले**.

डॉ. काकासाहेब देवधर यांची जयंती संपन्न

दि. १३ जून २०१७ रोजी डॉ. काकासाहेब देवधर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी इ. १० वी ची विद्यार्थिनी कु. समिक्षा गांगुर्डे हिने डॉ. काकासाहेब देवधर यांच्या कार्याचा जीवनलेख विस्तृत स्वरुपात मांडला. तसेच मा. वि. डॉ. एकनाथ कुलकर्णी यांनी डॉ. काकासाहेब देवधर यांना समर्पित केलेल्या काव्याचे वाचन केले.

शिक्षणमहर्षी डॉ. अण्णासाहेब खैर यांची जयंती संपन्न

दि. १५ जून २०१७ रोजी विद्यालयामध्ये शिक्षणमहर्षी डॉ. अण्णासाहेब खैर यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका सौ. सोनिया राजवाडे यांनी अण्णांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून पूजन केले. इ. १० वी मधील विद्यार्थिनी कु. नवेली पाटील हिने अण्णांच्या जीवनातील काही प्रसंग सांगून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील महान कार्याचा आढावा घेतला.

योगदिन उत्साहात साजरा

